MHBI160011512025

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२६१/२०२५ मधील</u>**
**<u>निशाणी क्र. १ खालील आदेश.</u>**
**<u>अंकुश व इतर वि. निरंक</u>**

प्रस्तूतचा अर्ज हा अर्जदार यांनी बॉम्बे रेग्यूलेशन अधिनियम १८२७ च्या तरतुदी अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार हे अर्जात नमुद पत्यावरील रहिवाशी आहेत. मयत कमलबाई उत्तम कैतके ही मौजे टाकळवाडी, ता. शिरूर कासार येथील रहिवासी होती व ती दिनांक २०/०५/२०२३ रोजी मयत झाली. अर्जदार क्र.१ व २ हे मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे मुले आहेत. तसेच मयत कमलबाई उत्तम कैतके हिचे पती देखील यापूर्वीच मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ व २ या व्यतिरिक्त मयत कमलबाई उत्तम कैतके हिस इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे मृत्यु पश्चात अर्जदार क्र.१ व २ यांना शासकीय, निमशासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी वारस दाखल्याची गरज आहे. करीता, अर्जदार क्र. १ व २ यांनी ते मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे एकमेव वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेसाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार यांनी त्यांचे कथनांचे पुष्ठयर्थ निशाणी ११ वर मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच निशाणी १२ वर मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे पती मयत उत्तम माधव कैतके यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच निशाणी ०४ च्या यादीलगत अर्जदार क्र.१ व २ यांचे ओळखपत्र

म्हणून त्यांच्या आधारकार्डच्या प्रति दाखल केल्या आहेत. तसेच अर्जाच्या पृष्ठयार्थ अर्जदार क्र.२ ने निशाणी १३ वर त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदार क्र.२ यांनी अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली असुन अर्जातील मागणीस अनुसरुन वारसा प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

४. अर्जातील कथनास अनुसरुन जाहीरनामा निशाणी ७ काढण्यात आला. त्याचप्रमाणे दिनांक २३/०९/२०२५ रोजी दैनिक सिटीझन या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस निशाणी १० प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार अर्जदार यांना त्यांचे मागणी प्रमाणे ते मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे वारस असले बाबत दाखला देणेसंदर्भात हरकती मागविण्यात आल्या. परंतु, विहीत कालावधीत कोणीही न्यायालयात हजर राहून अर्जदार क्र. १ व २ यांना त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेबाबत हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदार क्र. १ व २ यांचे मार्फत अभिलेखावर आलेला तोंडी पुरावा व त्याबाबत वरील विवेचना वरून असे दिसून येते की, अर्जदार क्र.२ ने त्याचे पुराव्यात मयत कमलबाई उत्तम कैतके हिस तो व इतर अर्जदार हेच एकमेव वारस असल्याचे शपथेवर कथन केले आहे. अर्जदाराचे सदरचे कथन कोणीही आव्हानलेले नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा आहे तसा स्वीकारणे क्रमप्राप्त होते. परिणामी, अर्जदाराच्या उपलब्ध पुराव्यावरून अर्जदार क्र.१ व २ हे मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. करीता, अर्जदार क्र. १ व २ हे त्यांचे मागणीप्रमाणे ते मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ व २ हे मयत कमलबाई उत्तम कैतके यांचे वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र सिव्हील मॅन्युअलचे भाग १४ परिच्छेद क्र.३१२ नुसार योग्य त्या कोर्ट फी रकमेवरती जारी करण्यात यावे.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.04.17 16:51:43 +0530

स्थळः– शिरूरकासार.
दि.१७/०४/२०२६

**(अ.सं.जगताप)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शिरूरकासार.

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 17/04/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 17/04/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.04.17 16:52:13 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3